# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO २१००१:२०१८) (ISO/IEC २७००१:२०१३)
शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१
दू.क्र.: ०२२-६२५४२१००/११०
संकेतस्थळ: www.msbte.ac.in ईमेल: secretary@msbte.com

**परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नित संस्था

**विषय: शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी नविन प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी (Enrollment) व त्यांचे हिवाळी-२०२५ परीक्षा करीताचे अर्ज भरण्याकरीताचे वेळापत्रकात अंशत: बदल करणेबाबत..**

**संदर्भ:** १) मरातंशिमं/का-४०/परीक्षाविभाग-F1/२०२५/२०७, दि. १२/०८/२०२५
२) तंशिसं/पदविका प्रवेश/दहावी नंतरचे प्रथम वर्ष/२०२५/प्रवेशाचा अंतिम दिनांक सुधारित/३६९, दि. १२/०८/२०२५

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाद्वारे संदर्भ क्र. १ मधील परीपत्रकान्वये जाहीर करण्यात आलेल्या **AICTE मान्यताप्राप्त अभ्यासक्रमातील प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षामध्ये नविन प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता नोंदणी (Enrollment) व** हिवाळी २०२५ परीक्षेकरीता परीक्षा अर्ज भरण्याच्या वेळापत्रकात संदर्भ क्र. २ अन्वये तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडून शैक्षणिक वर्ष २०२५-२६ प्रवेशासाठीच्या अंतिम दिनांकात बदल करण्यात आल्यामुळे खालीलप्रमाणे अंशतः बदल करण्यात येत आहे.

**प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षामध्ये नविन प्रवेशित विद्यार्थ्यांकरीता परीक्षा अर्जाबाबतचे वेळापत्रक -**

| अनु. क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १ | संस्थास्तरावर नविन प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करुन नियमित परीक्षा शुल्कासह परीक्षा अर्ज भरणे व निश्चित करणे | ८ ते १९ सप्टेंबर,२०२५ |
| २ | नियमित परीक्षा शुल्क + रु. २००/- दंडासह परीक्षा अर्ज भरणे व निश्चित करणे | २० ते २३ सप्टेंबर, २०२५ |
| ३ | नियमित परीक्षा शुल्क + रु. १,५००/- दंडासह परीक्षा अर्ज भरणे व निश्चित करणे | २४ ते २६ सप्टेंबर, २०२५ |
| ४ | विभागीय कार्यालय स्तरावर नविन प्रवेशित विद्यार्थ्यांचे नोंदणी अर्ज व परीक्षा अर्ज निश्चित करणे | २५ ते २९ सप्टेंबर, २०२५ |
| **विभागीय कार्यालय स्तरावर नविन प्रवेशित विद्यार्थ्यांसह सर्व सत्रांतील विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२५ परीक्षेकरीता परीक्षा अर्ज निश्चिती अंतिम दिनांक २९ सप्टेंबर, २०२५** | | |

**शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या (Non-AICTE) अभ्यासक्रमातील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये नविन प्रवेशित विद्यार्थ्यांची संस्थेमार्फत नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर व विभागीय कार्यालयाकडून नोंदणी निश्चित झाल्यानंतरच उपरोक्त तक्त्यात नमूद कालावधीमध्ये सत्र पद्धतीच्या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२५ करीताचे परीक्षा अर्ज उपलब्ध करून देण्यात येतील.**

**प्रथम वर्ष व थेट द्वितीय वर्षामध्ये नविन प्रवेशित विद्यार्थी वगळता इतर सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज संदर्भ क्र. १ मधील परीपत्रक व शैक्षणिक वेळापत्रकात नमूद कालावधीमध्येच भरून विभागीय कार्यालयामार्फत निश्चित करून घेण्यात यावेत.**

तरी सर्व संस्थाप्रमुखांनी संदर्भ क्र. १ मधील परीपत्रकात नमूद सूचनांचे पालन करून वर नमूद कालावधीमध्ये नविन प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी करून त्यांचे हिवाळी परिक्षा – २०२५ करीताचे परीक्षा अर्ज विभागीय कार्यालयात निश्चित करावेत. विभागीय कार्यालय यांच्यामार्फत निश्चित झालेले परीक्षा अर्जच हिवाळी परिक्षा-२०२५ करीता ग्राह्य धरण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

Signed by Umesh
Teniprasad Nagdeve
Date: 25-08-2025 18:04:03
(उमेश टे. नागदेवे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत –
१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई-५१ यांना माहितीस्तव सादर.
२) उपसचिव, म. रा. तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय- मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीकरीता.